



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार १७ एप्रिल २०२५ | अंक १२६ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



SUN Tourism International Pvt. Ltd. Since 2007 · All Tours घर से घर तक · दिल से दिल तक · www.suntourismpune.in

सन टुरिझम

प्रस्तुत करते


देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !

आमच्या विशेष टूर पॅकेजेस

काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...

-: अधिक माहितीसाठी संपर्क :-

99222 22272 / 7602727555

# दिल्लीकर चाखणार कोकणातील हापूसची चव

## आंबा महोत्सवाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन



### महाराष्ट्र दिनी चाखता येणार खास हापूसची चव

कोकणातील देवगड व रत्नागिरीतील हापूस आंबा महाराष्ट्रात व देशभरात खूपच प्रसिद्ध आहे. कोकणातील शेतकऱ्यांना विविध राज्यांमध्ये थेट बाजारपेठ उपलब्ध व्हावी, त्यांना जास्तीत जास्त नफा मिळावा, आंब्याच्या निर्यातीला अधिक चालना मिळावी, या उदात्त हेतूने खासदार वायकर यांनी दिल्ली येथील महाराष्ट्र सदनमध्ये 30 एप्रिल ते 1 मे (महाराष्ट्र दिन) पर्यंत आंबा महोत्सवाचे आयोजन केले आहे. या महोत्सवामुळे ग्रामीण भागातील उद्योजकांना मोठ्या प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. या महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे ही आयोजन करण्यात येणार आहे. महोत्सवाला केंद्रीय मंत्री, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री यांच्या बरोबरच देशाच्या विविध राज्यातील खासदार व आमदारही उपस्थित राहणार आहेत.

उन्हाळा म्हटलं की अनेकांच्या कपाळावर आठ्या उमटतात, पण आंब्याचं नाव काढलं की तोच उन्हाळा सुसह्य होण्याची शक्यता वाढते. आंबा आवडत नाही असा माणूस विराळाच. कोकणातील हापूसची चव ही प्रत्येक आंबाप्रेमीच्या जीभेवर रेंगाळते, अगदी परदेशातही हा आंबा जातो. आता याच हापूसची चव देशाच्या राजधानीतल्या लोकांना अर्थात दिल्लीकरांनाही चाखता येणार आहे. कशी आणि कुठे ? अहो खुद्द दिल्लीत, कारण राजधानी दिल्लीमध्ये आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार असून या दिमाखदार महोत्सवाचे उद्घाटन खुद्द देशाच्या पंतप्रधानांच्या, नरेंद्र मोदींच्या हस्ते होणार आहे.दिल्ली महाराष्ट्र सदन येथे आयोजित आंबा महोत्सवाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार असून 30 एप्रिल रोजी सायंकाळी 6 वाजता उद्घाटन सोहळा पार पडणार आहे. 27 मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रविंद्र वायकर यांच्या अभिनव संकल्पनेच्या मध्यमातून दिल्ली येथे या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. 30 एप्रिल व 1 मे असे दोन दिवस आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असन दिल्लीकरांना अस्सल देवगड, रत्नागिरी हापूस आंब्याची तसेच अन्य कोकणी उत्पादनांची चव चाखायला मिळणार आहे. तसेच या दोन दिवसांत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलं आहे.

## सांस्कृतिक पुनरुज्जीवनासाठी साहित्यिकांचे बीडमध्ये मराठी भाषा संवर्धन मंत्र्यांना साकडे

# साहित्यिक डॉ.दिपाताई क्षीरसागरयांचे ना.उदय सामंत यांना निवेदन

प्रतिनिधी | बीड (फोटो) दि.१६ : जिल्ह्याच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी आणि त्याचे जतन व विकास करण्यासाठी बीडच्या साहित्यिक डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी उद्योग व मराठी भाषा संवर्धन मंत्री उदय सामंत यांना निवेदन सादर केले. या निवेदनात बीड शहराच्या ऐतिहासिक, आध्यात्मिक आणि साहित्यिक परंपरेला चालना देणाऱ्या अनेक योजनांचा समावेश आहे.डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी बीड येथे उद्योग व मराठी भाषा संवर्धन मंत्री उदय सामंत यांना दिलेल्या निवेदनात जिल्ह्यातील सांस्कृतिक, शैक्षणिक विकासासाठी विविध मागण्या मांडल्या आहेत. निवेदनात पुढे म्हटले आहे की, बीडमधील पाटंगण घराण्याकडे असलेल्या दुर्मिळ पोथ्यांचे स्कॅनिंग व डिजिटायझेशन करून त्या सुरक्षित ठेवण्यासाठी स्वतंत्र इमारतीत ग्रंथालय उभारण्यात यावे. अंबाजोगाई येथे मराठी भाषा विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करा. बीड परिसरातील विविध अध्यात्मिक परंपरांचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र अध्यासन केंद्र उभारावे. बीड, माजलगाव, धारूर, पाटोदा, अंबाजोगाई, गेवराई या परिसरातील मठ व मंदिरांच्या परंपरांचा अभ्यास करण्यासाठी अभ्यास गट स्थापनेची गरज व्यक्त करण्यात आली आहे. पाटंगण मठातील ललित कीर्तन परंपरेचा



आणि इतर ठिकाणच्या सांस्कृतिक वारशाचा अभ्यास महत्त्वाचा ठरेल. रामतीर्थ येथील गिरिधर स्वामी, राघवस्वामी व देवस्वामी यांच्या समाधीस्थळांचा जिर्णोद्धार करून तेथे सुशोभीकरण करण्यात यावे. तसेच, संत ज्ञानेश्वर यांचे आजोबा गोविंदपंत यांच्या समाधीस्थळाचा जिर्णोद्धार करणेही आवश्यक आहे. बीडचे शासकीय ग्रंथालय अधिक सुसज्ज आणि आधुनिक करण्यात यावे, अशी विनंती करण्यात आली आहे. जिल्ह्यात 'पुस्तकांचे गाव' ही योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात यावी. यावर्षीचे मराठी भाषा संमेलन बीड येथे घ्यावे, अशी विनंती डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी केली असून, अशी संधी मिळाल्यास त्यांना आनंद होईल असे त्यांनी नमूद केले.

### मंत्री सकारात्मक निर्णय घेतील

या सर्व मागण्या बीडच्या सांस्कृतिक जडणघडणीसाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. मंत्री उदय सामंत यांनी या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी व्यक्त केली आहे.

# जन्मदात्या पित्यानेच केला मुलीवर अत्याचार

नेकनूर बीड तालुक्यातील नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत नात्याला काळिमा फासणारी घटना समोर आली आहे. जन्मदात्या पित्यानेच आपल्या ११ वर्षीय मुलीवर बलात्कार केल्याची संतापजनक घटना शुक्रवार रोजी घडली होती. या प्रकारणात आज गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या एका गावातील दाम्पत्यामध्ये घरगुती कारणावरून वाद निर्माण झाले होते. या वादातून आरोपीची पत्नी पुण्याला निघून गेली होती. तर मुलगी एकटी घरी होती. शुक्रवारी रात्री राहत्या घरातच नराधम पित्याने पोटाच्या मुलीवर अत्याचार केला. सदरील प्रकार हा मुलीची आई पुण्यावरून आल्यानंतर समोर आला. पिडीतेच्या आईने याबाबत आज नेकनूर पोलीस ठाण्यात जावून नराधम पित्या विरोधात तक्रार दाखल केली त्यानुसार आरोपीविरोधात बाल लैंगिक अत्याचार विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. सध्या नराधाम आरोपी नेकनूर पोलिसांच्या ताब्यात आहे. या घटनेमुळे नेकनूर परिसरात खळबळ उडाल

## आद्यकवी मुकुंदराज यांचे जन्मस्थान अंबाजोगाई होणार पुस्तकाचे गाव

# उद्योग तथा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांची घोषणा

बीड, दि.16 (जि. मा. का) आद्यकवी मुकुंदराज यांचे जन्मस्थान असलेल्या अंबाजोगाईला पुस्तकाचे गाव म्हणून जाहीर करण्यात येईल. अशी घोषणा राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज येथे केली. येत्या 2 महिन्यात याबाबतची कार्यवाही पूर्ण केली जाईल असे श्री सामंत म्हणाले. खोलेश्वर महाविद्यालय, योगेश्वरी महाविद्यालय, कवी मुकुंदराज समाधी स्थळ, शासकीय महाविद्यालय आणि अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय या पाच




ठिकाणी या कवितांच्या गावातील दालन सुरू करण्यात येतील. आज श्री सामंत यांनी जिल्ह्यातील साहित्यकांशी संवाद साधला यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी खासदार संदिपान भूमरे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक तसेच अनिल जगताप यांची या पत्रकार परिषदेत उपस्थिती होती. आजच्या साहित्यिक संवादात श्रीमती दीपा क्षीरसागर, विवेक निरगणे, संजय पाटील देवळाणकर, आनंद कराड, प्रभाकर साळेगावकर, सतीश साळुंके, बाळासाहेब पठारे, महेश वाघमारे, राजकिशोर मोदी तसेच अतुल कुलकर्णी या आदींची प्रमुख उपस्थिती होती. आद्यकवी मुकुंदराज यांनी लिहिलेला विवेक सिंधू हा ग्रंथ सध्या मुद्रित स्वरूपात उपलब्ध नाही तो उपलब्ध करून द्यावा अशी मागणी साहित्यिकांनी केली. त्यावर हा ग्रंथ उपलब्ध करून देण्याचे आश्वासन मंत्री महोदयांनी दिले. समन्वय अधिकारी नियुक्त श्री उदय सामंत यांनी कवितेचा गाव ही संकल्पना घोषित केल्यावर ती यथाशिघ्र पूर्ण व्हावी यासाठी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी त्वरित आदेश जारी केले.

या उपक्रमाच्या पूर्ततेसाठी अप्पर जिल्हाधिकारी अंबाजोगाई यांना समन्वय अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले असून उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई हे सहसमन्वयक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

*******

# माजलगावातील थरारक घटना

माजलगाव शहरातील भाजप कार्यालयातून बाहेर निघालेल्या तालुका सरचिटणीसवर वार करत असताना ते तेथून पळाले. वाचवा म्हणत ओट्यावर बसलेल्या लोकांकडे पळाले असता त्यांच्यावर पाठीमागून आलेल्या आरोपीने कोयत्याने शरीराच्या एका बाजूस वार केला. ङ्बलात्कार करतो काफ असे म्हणत त्याच्या शरीरावर सपासप वार केले. यात पदाधिकाऱ्याचा जागीच मृत्यू झाला. ही थरारक घटना मंगळवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास घडली. हत्येनंतर आरोपी पोलिसांना शरण आला बाबासाहेब प्रभाकर आगे (३४) असे मयताचे नाव आहे, तर नारायण शंकर फपाळ (३८) असे आरोपीचे नाव आहे. माजलगाव बसस्थानकापासून जवळच असलेल्या भाजप कार्यालयात भाजपचे तालुका सरचिटणीस व बीड जिल्हा लोकसभेचे विस्तारक असलेले बाबासाहेब आगे आपल्या साथीदारांसह बसले होते. दुपारी अडीच वाजेच्या सुमारास ते कार्यालयातून बाहेर पडत असताना हातात कोयता घेऊन आलेल्या नारायण फपाळ याने अचानक येऊन बाबासाहेब आगेंवर वार करण्याचा प्रयत्न केला.



दुपारी माजलगाव शहरातील शाहू नगर भागात भाजपा कार्यालय आहे. येथे आज दुपारी तालुका सरचिटणीस बाबासाहेब आगे कामानिमित्त आले होते. काम आटोपून बाहेर पडताच तेथे दबा धरून बसलेल्या नारायण शंकर फपाळ याने त्यांच्यावर कोयत्याने हल्ला केला. बचावासाठी आगे पुढे पळाले तेव्हा फपाळ याने पाठलाग केला. जिवाच्या आकांताने पुढे पळणाऱ्या आगे यांना स्वामी समर्थ केंद्राच्या बाजूला असलेल्या रस्त्यावर फपाळ याने गाठले. त्यानंतर फपाळ याने आगे यांच्यावर कोयत्याने सपासप वार केले. प्रत्यक्षदर्शीनुसार फपाळ याने अगोदर आगे यांच्या पोटात वार करून दोन वार डोक्यात केले. त्यानंतर फपाळ तेथून पसार झाला. नागरिकांनी माहिती दिल्यानंतर पोलिसांनी घटनेस्थळी धाव घेतली. पाहणी करून घटनास्थळाचा पंचनामा करत पोलिसांनी बाबासाहेब आगे यांना गंभीर जखमी अवस्थेत ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. येथे तपासून डॉक्टरांनी आगे यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले..

# बीड जिल्ह्यासाठी आनंदाची बातमी, पालकमंत्री अजित पवारांचा तरुणांसाठी मोठा निर्णय

गेल्या काही दिवसांपासून बीड जिल्हा हा विविध कारणांमुळे चर्चेत आहे. बीड जिल्ह्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. बीडमध्ये हत्या, खून, अत्याचार, आत्महत्या अशा अनेक घटना वारंवार घडताना दिसत आहेत. त्यातच आता उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी बीड जिल्ह्यातील जनतेला एक आनंदाची बातमी दिली आहे. बीडमध्ये लवकरच तरुणांना रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.अजित पवार यांनी नुकतंच त्यांच्या अधिकृत ट्विटरवरुन एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी बीड जिल्ह्यासाठी आनंदाची बातमी..! असे म्हटले आहे. बीडमध्ये लवकरच तरुणांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. यासाठी टाटा टेक्नॉलॉजी कंपनी जिल्ह्यात तब्बल १९१ कोटी रुपये खर्चून एक नवीन प्रशिक्षण केंद्र (सीआयआयआयटी) उभारण्यात येणार आहे, असे अजित पवार म्हणाले. अजित पवार काय म्हणाले?

बीड जिल्ह्यातील विद्यार्थी, युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्यविकासाच्या माध्यमातून उद्योगक्षम बनवण्यासह रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन अँड ट्रेनींग' अर्थात (सीआयआयआयटी) स्थापनेच्या दिशेनं पहिलं पाऊल टाकलं जात आहे. बीडचा पालकमंत्री या नात्यानं मला सांगताना अतिशय आनंद होत आहे की, टाटा टेक्नॉलॉजी कंपनीनं जिल्ह्यासाठी १९१ कोटी रुपये खर्चून नवीन सीआयआयआयटी स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या नवीन सेंटरमधून दरवर्षी ७ हजार युवकांना जागतिक दर्जाचं औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण दिलं जाणार आहे. त्यातून बीड जिल्ह्यात



उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, ही अत्यंत समाधानाची बाब आहे, असेही अजित पवारांनी सांगितले. बीड जिल्ह्यासाठी आनंदाची बातमी..! बीड जिल्ह्यातील विद्यार्थी, युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्यविकासाच्या माध्यमातून उद्योगक्षम बनवण्यासह रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन अँड ट्रेनींग' अर्थात(सीआयआयआयटी)...— Ajit Pawar (@AjitPawarSpeaks) April 16, 2025 दरम्यान बीड जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर नागरिक चिंतेत होते. अशा परिस्थितीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तरुणांना नवी उमेद देणारी बातमी दिली आहे. या प्रशिक्षण केंद्रामुळे जिल्ह्यातील हजारो तरुणांना उच्च दर्जाचे प्रशिक्षण मिळेल. त्यांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. टाटा टेक्नॉलॉजीसारख्या प्रतिष्ठित कंपनीने बीडमध्ये गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतल्यामुळे जिल्ह्याच्या औद्योगिक विकासालाही चालना मिळण्यास मदत होणार आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १६ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com




संपादकीय

# भाजपा - अण्णा द्रमुक युतीचे स्टॅलिनना आव्हान!

तामिळनाडूत एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखाली द्रमुक पक्ष भक्कम पाय रोवून असताना भाजपाने अण्णा द्रमुक पक्षाशी युती केल्याचे जाहीर केले व आगामी विधानसभा निवडणूक अण्णा द्रमुकचे नेते एडप्पादी पलानीस्वामी यांच्या नेतृत्वाखाली युती लढवणार असल्याची भाजपाने घोषणा केली. ही घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी चेन्नईत जाऊन केली आणि स्टॅलिन सरकारचे आता दिवस भरले असा सज्जड इशारा दिला. संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन नुकतेच संपले. या अधिवेशनाच्या अखेरीस मोदी सरकारने मांडलेल्या वक्फ सुधारणा विधेयकावर लोकसभा व राज्यसभेत वादळी चर्चा झाली. या विधेयकाला विरोध करण्यासाठी भाजपा विरोधक एकवटले होते. वक्फ सुधारणा विधेयक मुस्लिमांच्या विरोधात आहे, अशी खरमरीत टीका काँग्रेस, सपा, तृणमूल काँग्रेस, द्रमुक आदी विरोधी पक्षांनी केली. अण्णा द्रमुकने याच सुरात सूर मिसळला होता. एवढेच नव्हे तर वक्फ सुधारणा सरकारच्या विरोधात अण्णा द्रमुक पक्षाच्या खासदारांनी राज्यसभेत मतदानही केले. मग असे अचानक काय घडले की भाजपा व अण्णा द्रमुक हे दोन्ही पक्ष एकदम जवळ आले? अमित शहा मुत्सद्दी राजकारणी आहेत, तसेच राजकीय कुटनीतीमध्ये ते चाणक्य म्हणून ओळखले जातात. जो राजकीय पक्ष संसदेत भाजपाला साथ देत नाही, ज्या राजकीय पक्षाने गेल्या निवडणुकीत भाजपाशी युती तोडली त्या अण्णा द्रमुकशी भाजपाने पुन्हा युती केली, त्या पक्षाला एनडीएमध्ये दाखल करून घेतले, या सर्व घटना एवढ्या झटपट घडल्या की त्याचे देशातील सर्वच राजकीय पक्षांना आश्चर्य वाटले. तामिळनाडू विधानसभा निवडणुकीसाठी अण्णा द्रमुक पक्षाबरोबर घाईघाईने युती का करण्यात आली हे गूढ अनेकांना उलगडलेले नाही. यापूर्वी भाजपाने आपली ताकद वाढविण्यासाठी सर्व शक्ती पश्चिम बंगालमध्ये पणाला लावली होती, तसेच आता भाजपाने अण्णा द्रमुकची पुन्हा युती करून एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील द्रमुक सरकार चेन्नईच्या तख्तावरून खाली खेचण्याचा चंग बांधला आहे. तामिळनाडूत पक्ष विस्तारासाठी भाजपा गेली दहा-बारा वर्षे अटोकाट प्रयत्न करीत आहे. पण द्रमुक विरुद्ध अण्णा द्रमुक अशा लढाईत भाजपाचे काही फावत नाही हे श्रेष्ठींना कळून चुकले आहे. स्टॅलिन हे करारी नेतृत्व आहे. ते मोदी सरकारपुढे झुकत नाहीत, भाजपापुढे नमत नाहीत आणि परंपरागत राजकीय शत्रू असलेल्या अण्णा द्रमुकला वाढू देत नाहीत. द्रमुकला सत्तेवरून हटवायचे असेल तर आपण दोघांनी एकत्र येणे गरजेचे आहे, याची जाणीव भाजपा व अण्णा द्रमुक या दोन्ही पक्षांना झाली आहे. म्हणूनच राजकीय अरिहार्यतेतून आगामी विधानसभा निवडणूक भाजपा अण्णा द्रमुक यांची युती लढणार असल्याची घोषणा स्वतः अमित शहा यांनी चेन्नईत येऊन केली. अण्णा द्रमुकशी युती करण्यात भाजपाचे मावळते प्रदेशाध्यक्ष अन्ना मलाई यांचा मोठा अडथळा होता. त्यांचा अण्णा द्रमुकशी युती करायला कठोर विरोध होता. स्वतः अन्ना मलाई हे लढाऊ नेतृत्व आहे. त्यांनी द्रमुक सरकारच्या विरोधात लढताना पक्षात जान आणली व पक्षाचा पाया भक्कम केला हे मान्य करावेच लागले. जिथे भाजपाला कोणी विचारत नाही, भाजपाची केडर नाही, अशा राज्यात भाजपाच्या मतांची टक्केवारी ३ वरून ११ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात अन्ना मलाई यांचे मोठे योगदान आहे. म्हणूनच अन्ना मलाई यांच्या कामगिरीकडे दुर्लक्ष करणे व त्यांना पदावरून दूर करणे हे भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाला कठीण होऊन बसले होते. अन्ना मलाई हे निवृत्त आयएएस अधिकारी आहेत. ते तरुण आहेत. सन २०१९ मध्ये त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली व भाजपात प्रवेश केला. आपल्या दमदार कामाने त्यांनी मोदी-शहांचेही मन जिंकले. त्यांच्या कामाची तडफ पाहूनच त्यांच्यावर तामिळनाडूच्या प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी दिली. प्रदेशाध्यक्ष झाल्यावर त्यांनी सत्तेवरील द्रमुक सरकारच्या विरोधात जोरदार मोहीम सुरू केली. स्टॅलिन सरकारला सतत ते हैराण करू लागले. सन २०२६ मध्ये तामिळनाडूमध्ये होणारी विधानसभा निवडणूक अन्ना मलाई यांच्याच नेतृत्वाखाली भाजपा लढवणार असे सर्वांना वाटले होते. आगामी विधानसभा निवडणुकीत अन्ना मलाई हेच भाजपाचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा असतील अशीही चर्चा होत असे. राजकारणात दिसते तसे नसते याची प्रचिती सर्वांनाच आली. भाजपा श्रेष्ठींनी भाकरी फिरवली. अचानक अन्ना मलाई यांची प्रदेशाध्यक्षपदावरून पक्षाने उचलबांगडी केली. त्यांना प्रदेशाध्यक्षपदावरून हटविल्याशिवाय द्रमुकशी युती होणार नाही, याची श्रेष्ठींना खात्री होती. म्हणून त्यांच्या जागी नयनार नागेंद्र यांची पक्षाने नेमणूक केली व लगेचच भाजपा-द्रमुक युती झाल्याची घोषणा केली. ६४ वर्षांच्या नयनार नागेंद्रन यांनी भाजपाचे तामिळनाडू प्रदेशाध्यक्ष म्हणून १२ एप्रिल रोजी सूत्रे हाती घेतली. नागेंद्रन हे मृदुभाषी व्यक्तिमत्त्व आहे. दक्षिणी तिरूनेलवेली मतदारसंघातून ते आमदार आहेत. अन्ना मलाईंसारखे ते आक्रमक नाहीत, मग पक्षाचा अजेंडा कसा राबवणार? अण्णा द्रमुकचे नेते जे म्हणतील ते मान्य करून युती भाजपाला युती चालवायची आहे. स्टॅलिन सरकारचा पराभव हा एकमेव अजेंडा भाजपा-अण्णा द्रमुक युतीपुढे आहे. लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने तामिळनाडू हे पाचवे मोठे राज्य आहे. भाजपाने कर्नाटकमध्ये जम बसवला, पण केरळ व तामिळनाडूत भाजपाला फारसा शिरकाव करता आला नाही, आता २०२६ च्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने भाजपाने अण्णा द्रमुकला पुन्हा बरोबर घेऊन पक्ष विस्ताराचा अजेंडा तयार केला आहे. सन २०२४ ची लोकसभा निवडणूक भाजपाने स्वबळावर तामिळनाडूत लढवली होती. या निवडणुकीत भाजपाला ११ टक्के मते मिळाली. लोकसभा निवडणुकीत भाजपाचा एकही उमेदवार खासदार म्हणून निवडून आला नाही. तत्कालीन प्रदेशाध्यक्ष अन्ना मलाई हे सुद्धा पराभूत झाले. तामिळनाडूत पक्षाला मोठा आधार नाही व स्वबळावर निवडणूक लढणे हे फायद्याचे नाही हे भाजपा श्रेष्ठींच्या लक्षात आले. पुन्हा जुन्या मित्रपक्षाला बरोबर घेऊन आगामी विधानसभा निवडणूक लढवावी असा विचार पक्षात प्रबळ होऊ लागला, त्यातूनच भाजपाची साथ सोडून गेलेल्या अण्णा द्रमुक पक्षाला भाजपाने पुन्हा पायघड्या अंथरल्या. संसदेचे अधिवेशन संपल्यावर अण्णा द्रमुकच्या नेत्यांनी दिल्लीत जाऊन अमित शहांबरोबर चर्चा केली आणि अमितभाईंनी चेन्नईला जाऊन भाजपा-अण्णा द्रमुक युतीची घोषणा केली. सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत तामिळनाडूतील सर्व ३९ जागांवर द्रमुकचे खासदार विजयी झाले. द्रमुकला ४६.९

# ओबीसी, आकाशातल्या स्वर्गापेक्षा, मुंबईचा जमीन मालकी हक्क महत्वाचा

ईस्ट इंडियन समाज हा सागरपुत्र आगरी कोळी भंडारी आदिवासी समाजाचा सख्खा भाऊ आहे. २०१६/ १७ साली मुंबईच्या गावठाण हक्कांचा लढा सुरू करताना, हा आमच्यातील बंधुत्वाचा अनुभव मी घेतला.आधुनिकता,शिक्षण,उच्च राहणीमान, साऱ्या जगाशी जोडलेला,अत्यंत सुसंकृत आणि प्रचंड मायाळू असा हा ईस्ट इंडियन भाऊ आहे.त्यांच्या गावात,घरात जाऊन प्रत्यक्ष अनुभवला पाहिजे.मु ंबईचे माजी नगरसेवक आल्मेडा साहेब, ड.गॉडफ्री पेमेंटा, ॲड.विवियन डिसोझा,जॉन्सन मिस्किटा,डेनिस डिसुझा असे एक एक प्रेमळ भाऊ मुंबई गावठाण चळवळीचे आधारस्तंभ आहेत.ज्यांच्या सहवासात जमिनीवरचे स्वर्गसुख अनेक ईस्ट इंडियन सांस्कृतिक कार्यक्रमात मी अनुभवले आहे. सांताक्रूझ मु ंबई येथील डिसुझा बिल्डिंग मु ंबई महानगर पालिकेने २०१४ साली धोकादायक ठरवली.अर्थात ती २०२४ पर्यंत पडली नाही.आजही ती पाडण्यासाठी जेसीबी मशीन लागतील.स्वतःच्या मालकीच्या जागेत असलेली ही इमारत आहे. शासकीय परवानगीने बांधली आहे.ती अतिक्रमित नाही की अनधिकृत नाही.१९७२ साली रहिवाशी लोकांनी स्वतः बांधली.मु ंबईतील अनेक १०० वर्षे जुन्या इमारती धोकादायक नाहीत?.मग पन्नास वर्षे जुनी केवळ दोन मजली इमारत धोकादायक कशी? मु ंबई महानगर पालिकेच्या पॅनल वरील मेहता नावाचा स्ट्रक्चरल ऑडिटर एकदा ही इमारत राहण्यास अयोग्य, धोकादायक ठरवतो.तोच मेहता ऑडिटर, डिसुझा बिल्डिंग रहिवाशी मंडळाच्या खर्चाने केलेल्या रिपोर्ट मध्ये, इमारत दुरुस्त करून राहण्यास योग्य आहे असे म्हणतो.धोकादायक नाही असे म्हणतो.लोकांनी स्वतः खर्च केला. आजपर्यंत राहिलेही.परंतु मुंबई महानगर पालिकेने,पोलिस घेऊन इमारतीचे पाणी आणि वीज कनेक्शन तोडले.कायद्याचे लॉजिक काय असावे? ७०० कोटी रुपयांची जमीन चोरी? ७० ते ८० वयाच्या वयोवृद्ध महिला येथे राहतात. परीक्षा देणारे विद्यार्थी राहतात.वीज पाण्याविना त्यांची झालेली बिकट अवस्था सांगायला माझे शब्द अपुरे पडतील.लोकांनी इमारत सोडावी, असे मुंबई महानगर पालिका, पोलिस,न्यायालय यांना वाटते.परंतु ही इमारत तोडल्यानंतर, वन रूम किचनचे, चाळीस हजार रुपये भाडे असलेल्या या उच्चभ्रू वस्तीत घर कुणी द्यायचे? म्हातारी माणसे ,विद्यार्थी जाणार कुठे? लोकांचे जीव वाचवायला सरकार निघाले? की आम्हाला मारायला निघालेय? आमचे लोक,आमची लोकशाही हा प्रश्न मु ंबई महानगर पालिका प्रशासन,न्यायालय,पोलिस यांना विचारू शकते का? माझ्या पत्रकार बांधवानी मला सांगावे.आता मु ंबई महानगर पालिकेत लोकप्रतिनिधी नाहीत. नगरसेवक नाहीत.ओबीसी इम्पीरीकल डेटा नाही. म्हणून आमचे स्थानिक स्वराज्य संस्थेतले ओबीसी राजकीय हक्क संपवून, उच्च जातीय हुकूमशाही, आम्हा स्त्री शूद्र अतिशूद्र यांना उध्वस्त करतेय? मुंबई हुकूमशाही कडे निघालीय का? सर्व राजकीय पक्षांनी,नेत्यांनी उत्तर द्यावे.ही माझी नम्र विनंती आहे.ख्रिश्चन मुस्लिम हिंदू सारे भारतीय येथे राहतात.परंतु संकटात मदत करणारा कोणताच धर्म,नरक यातना भोगणाऱ्या डिसुझा बिल्डिंग रहिवासी लोकांना,अजूनही सापडलेला नाही.मलाही दिसत नाही.आम्ही मु ंबईचे भूमिपुत्र मानवता,माणुसकी विसरलोय का? झाडाचे जोडलेले पान एकदा तोडले की पुन्हा जोडता येत नाही. असे भगवान बुद्ध म्हणाले होते.लोकांची राहती घरे पोलिस बंदोबस्तात तोडणाऱ्या,शासनाच्या जबरदस्तीच्या बुलडोझर संस्कृतीला कुणी तरी बुद्ध काय म्हणाले? हे समजाऊन सांगेल का? मागासवर्गीय, ओबीस, एससी, एसटी, अल्पसंख्याक, ख्रिश्चन मुस्लिम ही माणसे आहेत.दगड विटांची घरे तुटतात तशी ही भारतीय माणसे कोणत्याही युद्धाशिवाय मनाने तोडली जात आहेत.इकडे जरा लक्ष द्याल? खऱ्या अर्थाने धोकादायक नसलेली ही इमारत धोकादायक का ठरवली गेली?. तिथे राहणाऱ्या लोकांना स्वतःचा जीव प्यारा नाही का? मु ंबई महानगर पालिका, न्यायालय, पोलिस हे मुंबईकर भूमिपुत्र ईस्ट समाजाच्या लोकांवर एवढे फिदा का झाले? या सर्व प्रश्नांचे एकच उत्तर आहे. बिल्डर जमात. मुंबईचा विकास करायला उतावीळ झालेले बिल्डर मागासवर्गीय वस्त्यांत जाऊन विकास करत आहेत.किती मोठी समरसता? ज्यांना पूर्वी अस्पृश्य ठरविले. प्यायचे पाणी नाकारले.असे सारे उच्चवर्णीय बिल्डर, राजकारणी, पोलिस, पालिका अधिकारी आमच्या गलिच्छ वस्त्या विकसित करायला निघाले?. केवढे हे सामाजिक परिवर्तन?. मु ंबईतली सर्वात मोठी गलिच्छ झोपडपट्टी धारावी मोदी मित्र अदानी आपल्या पवित्र हस्ते विकसित करीत आहेत?.अयोध्या क्षत्रिय राम मंदिर निर्मिती पेक्षा, मागास शूद्र अतिशूद्र मुस्लिम ख्रिश्चन यांना घर देणे, पुण्याचे हे काम देव दुर्लभ असेल,नाही का? कितीहा वर्षे आरक्षण,घरे,रेशन दिले.तरी विकास मात्र उच्च वर्णियांचाच होतो. मागासवर्गीय मागेच का राहतात.असे का होते?.असाही प्रश्न ८५ टक्के स्त्री शूद्र अतिशूद्र या जन्माने मागास ठरवलेल्या लोकांच्या विरोधकांना पडत असेल? परंतु मनुस्मृतीचा काळ असो की भारतीय संविधानाच्या लोकशाहीचा, फसवले जातात मागासवर्गीय लोकच. अल्पसंख्यांक लोकच.अतिशय नियोजन पद्धतीने भारतात ब्राह्मण क्षत्रिय वैश्य लॉबी काम करीत आहे.डिसुझा इमारत ही त्याचे मूर्तिमंत उदाहरण आहे .दुसरीकडे महिलांच्या वारस नोंदी न करताच कल्याण डोंबिवलीच्या पिकत्या शेतजमिनी बिनशेती दाखवून पोलिसांच्या मदतीने लोढा बिल्डर लुटतोय. संविधानाने दिलेले अल्पसंख्यांक अधिकार गेले कुठे.केवळ ईस्ट इंडियन्स नाही तर आम्ही आगरी कोळी भंडारी आदिवासी या ठाणे रायगड पालघर नवी मुंबई येथे अल्पसंख्यक झालोय.बहुसंख्या असलेला हिंदू मध्ये शूद्र ओबीसींच्या जमिनी लुटतोय उच्चवर्णीय हिंदू. ईस्ट इंडियन ख्रिस्ती प्रार्थना मंदिर जे हेरिटेज आहे.ते तोडणार का? मागे सायन कोळीवाड्याचा काही हेरिटेज किल्ला परिसर असाच महानगर पालिकेने बिल्डर साठी उध्वस्त केला होता.कुठे आहे पुरातत्व विभाग? ईस्ट इंडियन डिसुझा बांधवांची सांताक्रूझ परिसरात शेती होती.घरे आणि गावठाण होते.ते पूर्वीचे हिंदू आगरी कोळी भंडारी आदिवासी होते.



राजाराम पाटील,
मो.८२८६०३१४६३,
शेतकरी प्रबोधिनी!
उरण रायगड,

वर्तमान काळात होणाऱ्या अशाच प्रकारच्या हिंदू उच्चवर्णीय शोषणास वैतागून त्यांनी धर्मांतर केले. अलीकडे संविधान कार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्म स्वीकारला. शोषक हिंदू धर्म नाकारला.अर्थात ईस्ट इंडियन समाजाने धर्मांतर करून खूप प्रगती केली.जमीन मालकी हक्क मात्र तो विसरला आहे.सायन कोळीवाड्यातील आगरी कोळी भंडारी ईस्ट इंडियन यांना हातोहात फसविणारे बिल्डर,पोलिस,मु ंबई महानगर पालिका यांना मी स्वतः पाहिलेय. मी त्या सायन कोळीवाड्यासाठी रस्त्यावरचा संघर्ष केलाय.मला माझी ताकद कमी पडली याचे कायम दुःख आहे.माझ्या मु ंबईकर भावा बहिणी यांना धोका समजत नाही.शत्रू समजत नाही.जमिनीचे मालकी हक्क समजत नाहीत. त्यासाठी करण्याचा सत्याग्रह,संविधानिक संघर्ष, लोकनेते दि बा पाटील यांच्यासारखा सर्वस्वाचा त्याग, ओबीसी समाजाचे लोकशाही संघटन समजत नाही. शासनाने पारंपरिक, वंशपरंपरेने वहिवाट जमीन मालकीची लेखी सनद डिसुझा रहिवाश्यांना दिली आहे.कारण आपले गाव,शेती व्यवसाय त्यांनी सांताक्रूझ मु ंबईच्या विकासासाठी देऊन मोठे बलिदान दिले होते.जसे नवी मु ंबईच्या आगरी कोळी कराड्यानी सिडको नवी मु ंबई साठी दिले आहे.अर्थात ईस्ट इंडियन येथेही नवी मु ंबईत होते.ओबीसी मागास वर्गीयांचा त्याग देश नेहमीच विसरतो.सरकारने दिलेली मालकीची सनद जिल्हाधिकारी बांद्रा यांच्या परवानगी शिवाय हस्तांतरित होत नाही.परंतु मृत ईस्ट इंडियन आजोबांच्या नावे असलेली जमीन मालकी षड्यंत्र करून संपवण्यात आली. कायदेशीर वारस नोंद झालीच नाही.आमचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची जिवंत सातबारा म्हणजे वारस नोंद योजना आहे कुठे? बिल्डरांनी ती जन्मन्या अगोदरच तिची वाट लावली आहे.मालकीच्या जागेत डिसुझा इमारत उभी असताना ती कागदोपत्री चोरीला गेली आहे. तीही दिवस रात्र जागी असणाऱ्या माया नगरी मातृसत्ताक मुंबईतून? बिल्डरांनी गोड बोलून भोळ्या ईस्ट इंडियन भूमी पुत्र समाजाचा काटा काढला.विकास करतो,असे सांगून स्वतःच्या नावे,बेकायदेशीर खरेदी खत नोंदविले आहे.हजारो कोटींचा हा भ्रष्टाचार मुंबई महानगर पालिकेच्या आवारात होत आहे.महानगर पालिकेत निवडणुका नाहीत. नगरसेवक लोकप्रतिनिधी नाहीत. प्रशासक बिल्डर धार्जिणे निर्णय घेतात.न्यायालये प्रत्यक्ष परिस्थिती पाहत नाहीत.कागदी घोडे बिल्डर हलवितात. नोटांचा चारा घोड्यांना घालतात.बिचारी रयत छत्रपती शिवरायांनी दिलेल्या स्वराज्याच्या आठवणी सांगत अशी रोज मरत आहे. मागील वीस वर्षे जमीन पोखरण्याच्या हालचाली सुरू होत्या.भूमी अभिलेख विभाग, जिल्हाधिकारी हे जमीन मालकी पाहतात.ही सत्य गोष्ट सांगूनही आमचे मु ंबई कर तिकडे कधी जात नाहीत. डिसुझा बिल्डींचा घात असा झाला आहे.नव्हे ठरवून केला आहे.मु ंबई पोलिस आयुक्तालयात, अल्पसंख्याक आयोगात तक्रार नोंदविली आहे. इमारत आजही उभी आहे.परंतु जमीन मालकी, इमारत तुटल्यानंतर डिसुझा बांधवांची राहील. लढावे लागेल.त्यासाठी पैसा मनुष्यबळ लागेल.हेच सत्य माझ्या ईस्ट इंडियन बांधवांना समजत नाही. लोक घाबरून ही जागा सोडून गेले? तर बिल्डर ताबा घेईल. त्यासाठीच मु ंबई महानगर पालिका पोलिस यांनी लाईट पाणी तोडले.ईस्ट इंडियन समाज,चर्च त्यांचे सर्व फादर,समाजसेवक यांना विनंती आहे.आपण तत्काळ मदत करून, मनाने तुटणाऱ्या डिसुझा बंधू भगिनींना मायेचा,मदतीचा हात द्या.जे मु ंबईत घडतेय ते उद्या ठाणे पालघर रायगड,नवी मु ंबईतही घडणार आहे.आगरी कोळी भंडारी आदिवासींनी मु ंबई आमची आहे.हे समजून घ्यावे.त्याचे लिखित पुरावे जिल्हाधिकारी भूमिअभिलेख येथे आहेत.ते पहा.जगायचे असेल तर घर गावठाण जमीन हवी. आकाशातला देव,आकाशातला स्वर्ग काय कामाचा? बुद्ध, चार्वाक, महावीर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लोकनेते दि बा पाटील म्हणाले.तेच आम्ही गावठाण चळवळीचे लोक ओरडून सांगतोय.मु ंबई वाचवा, स्वतःला, आईला, बहिणीला, भावाला, मुलाना, मित्रांना वाचवा. उद्या या मुंबईत.डिसुझा बिल्डिंग सांताक्रूझ मुंबईला.सारे सांगेन. येथे लिहायला जागा कमी पडते.

# किनवट तालुक्यातील बॉक्सिंग खेळाडू अजय पेंदोर शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने सन्मानित

## किनवट तालुक्यासह महाराष्ट्र व देशाकरीता गौरवाची बाब

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : शालेय शिक्षण व क्रीडा विभागद्वारा आयोजीत शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार वितरण समारंभ सन 2022-23 व सन 2023-24 चा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व इतर मान्यवर यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार 18 एप्रिल 2025 रोजी सकाळी 11 वा. शिवछत्रपती क्रीडा संकुल (बॅडमिंटन हॉल) म्हाळुंगे-बालेवाडी पुणे येथे संपन्न होणार आहे. या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार वितरण समारंभ करीता जिल्हयातील खेळाडू, मार्गदर्शक, प्रशिक्षक व क्रीडाप्रेमी यांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे. किनवट तालुक्यातील अजय पेंदोर (आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग खेळाडू) यांच्या कामगीरीची दखल



घेवून महाराष्ट्र शासनामार्फत शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सन 2023- 2 4 ने अजय पेंदोर (आंतरराष्ट्रीय बॉक्सींग खेळाडूं) यांना 3 लाख रुपये रोख, स्नमानचिन्ह, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानीत करण्यात येणार आहे. ही बाब किनवट तालुक्याची, संपूर्ण जिल्ह्याची, महाराष्ट्र व देशाकरीता गौरवाची आहे. अजय पेंदोर (आंतरराष्ट्रीय बॉक्सींग खेळाडूं) यांचे जिल्हयात सर्वत्र कौतुक होत असून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मेघना कावली, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी व जिल्हयातील विविध एकविध खेळसंघटनेचे पदाधिकारी, मार्गदर्शक, प्रशिक्षक यांनी त्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.


# ठाकरे आता भाजपाच्या धर्तीवर संघटन बांधणार? नाशिकच्या सभेत काय दिले आदेश?

उद्धव ठाकरे यांनी नाशिकमध्ये आयोजित करण्यात आलेल्या पक्षाच्या मेळाव्यात भाजपा, एकनाथ शिंदे यांना चांगलंच घेरलं. हिंदुत्त्वाच्या मुद्द्यापासून ते वक्फ विधेयकापर्यंतचा उल्लेख करून ठाकरेंनी आपल्या भाषणात तुफान टोलेबाजी केली. आपल्या याच भाषणात आता ठाकरेंनी आगामी निवडणुकीचा प्लॅनही आपल्या कार्यकर्त्यांना दिला. विशेष म्हणजे भाजपाने निवडणूक जिंकण्यासाठी ज्या पद्धतीने आपली रणनीती आखली आहे, अगदी त्याच धर्तीवर ठाकरेदेखील आपले संघटन बांधण्याच्या तयारीत आहेत. याबाबतची सगळी माहितीच ठाकरेंनी आपल्या भाषणात दिली आहे. ठाकरेंनी सांगितला भाजपाचा प्लॅन काय? “आपली तयारी कशी पाहिजे. सकाळी विनायक राऊतांनी बुथ मॅनेजमेंटचं मार्गदर्शन केलं. माझ्याकडे भाजप महाराष्ट्र, बुथ समिती गठणचा तपशील आहे. हे मुंबईचं आहे. आपलीही लोकं असतात हो इकडे-तिकडे. असं काही नाही की त्यांचीच लोकं आपल्याकडे असतात. त्यांच्याकडे काय चाललंय हे मला रोज कळतंय. त्यांनी कसं केलंय मांडणी कशी केली, हे मुद्दाम सांगतो,” असे ठाकरे आपल्या कार्यकर्त्यांना उद्देशून म्हणाले. माझ्याकडे सर्व विभाग आहे. सर्व सांगणार नाही. नाही तर कोणी पाठवलं ते कळेल. त्यात जबाबदारीचा एक विषय आहे. हे सारं मुंबईचं आहे, असंही त्यांना सांगितलं. आपणही तशीच तयारी केली पाहिजे- ठाकरे “भाजपाकडे एक बुथ अध्यक्ष आहे. त्याच्यापुढे त्या व्यक्तीचं नाव आणि मोबाईल नंबर आहे. नंतर बुथ सरचिटणीस आहे. त्यांचे पूर्ण नाव आणि मोबाईल नंबर आहे. मग सदस्य आहेत. लाभार्थी प्रमुखही आहेत. लाभार्थी प्रमुखाचेही नाव आणि मोबाईल नंबर आहे. त्यांनी सदस्यांच्या रकान्यात त्यांनी दहा सदस्यांची नावे दिली आहेत. प्रत्येकाचं पूर्ण नाव आणि मोबाईल नंबर, अशी त्यांची तयारी आहे. अशी तयारी आपण केली पाहिजे,” असे आवाहन ठाकरेंनी आपल्या कार्यकर्त्यांना केले.

12 सदस्यांचं गणित सांगि तलं“पुढे त्यांनी एक सूचना दिलेली आहे कीत की 12 सदस्यांमध्ये किमान तीन महिला प्रतिनिधी असाव्यात. नंतर किमान एक एससी आणि एसटी प्रतिनिधी असावा. ही त्यांची मांडणी आहे. या मांडणीने ते पुढे चालले आहेत. ईव्हीएम घोटाळा आहे. तो जरूर आहे. योजनांचं गारूड नक्की आहे. पण बुथ मॅनेजमेंटही महत्त्वाचं आहे. आपले बुथ प्रमुख आणि पोलिंग एजंट यांना ट्रेनिंग दिलं पाहिजे. बुथ प्रमुख हा यादीतील प्रत्येकाला नावानिशी चेहऱ्यासकट ओळखणारा पाहिजे. त्या टीममधला एक पोलिंग एजंट पाहिजे. असेल तर त्याला कळलं पाहिजे मतदानाला आलेला माणूस मतदानाच्या यादीतला आहे की नाही. त्याचा चेहरा जुळतोय की नाही,” असे ठाकरे आपल्या कार्यकर्त्यांना उद्देशून म्हणाले. ठाकरेंचा प्लॅन यशस्वी ठरणार का? दरम्यान, आता ठाकरेंनी आपल्या पक्षाने निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी काय तयारी करायला हवी, याची प्रातिनिधीक माहितीच आपल्या कार्यकर्त्यांना दिली आहे. त्यामुळे आगामी काळात या आराखड्यावर ठाकरेंच्या पक्षात नेमकं काय काम होणार? भाजपाच्या धर्तीवर ठाकरे पक्षाचं संघटन बांधणार असतील तर आगामी निवडणुकांत त्यांना किती यश येणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार

# उपकेंद्रावरील समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे मानधन रखडले

## किनवट सारख्या अतिदुर्गम भागात काम करुनही मानधन मिळेना



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : नांदेड जिल्ह्यातील थकीत मासिक वेतन कामावर आधारित मोबदला आणि पगार वाढीतील फरकातील रक्कम मिळणे बाबत महाराष्ट्र राज्य समुदाय आरोग्य अधिकारी संघटनेच्या वतीने जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांना संघटनेच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले. जिल्ह्यातील ग्रामीण भागात आरोग्य सेवा देणाऱ्या उपकेंद्रावरील समुदाय आरोग्य अधिकारी यांचे मागील आठ महिन्यापासून वेतन रखडले आहे. याबाबत आरोग्य विभागाकडे वारंवार पाठपुरावा करूनही निधी अभावी वेतन मिळत नसल्याने समुदाय आरोग्य अधिकारी अडचणीत आले आहेत.जिल्ह्यापासून कोसोदूर २०० किमी अंतरावर अतिदुर्गम किनवट माहूर अन्य आरोग्य उपकेंद्राच्या ठिकाणी उपकेंद्रात आपली सेवा बजावणाऱ्या समुदाय आरोग्य अधिकारी यांचे मानधन गेल्या आठ महिन्यापासून रखडल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत जिल्ह्यांना मिळणाऱ्या अनुदानाची प्रतिक्षा संपुष्टात येण्याची शक्यता असून, त्यामुळे आरोग्य व्यवस्थेवर मोठे आर्थिक संकट कोसळण्याची चिन्हे आहेत. ३१ तारखेपर्यंत मिळणाऱ्या निधीचा पुरवठा थांबल्यामुळे विविध समस्यांचा सामना करावा लागणार आहे. नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील उपकेंद्र स्तरावर आरोग्य सेवा देणारे समुदाय आरोग्य अधिकारी हे गेल्या आठ महिन्यापासून मानधनापासून वंचित आहेत. तसेच गेल्या तीन महिनायपासून वेतन सुद्धा थकित आहे. यामुळे सर्व समुदाय आरोग्य अधिकारी यांना प्रचंड आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याबाबत जिल्हास्तरावर वारंवार लेखी पाठपुरावा करून सुद्धा समुदाय आरोग्य अधिकारी यांना वेतन मिळालेले नाही. यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाकडुन वेतनाबाबत काही तोडगा काढणे गरजेचे आहे.

बीड/महाराष्ट्र
विशेष वार्ता

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

गुरुवार १७ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com





बीड शहरातील फुलाईनगर, कृष्ण मंदिर जवळ पवनपुत्र निवास येथे समाजसेविका सीमा ओस्तवाल, मनोज ओस्तवाल, वीरेंद्र ओस्तवाल यांनी महावीर भगवान स्वामी चा जन्मकल्याण उत्सव निमित्त रामायणतील सुंदरकांड चे पारायण व महाप्रसादाचे आयोजन केले होते. गुरु आनंद महिला प्रतिष्ठानच्या परिवाराच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून बीड शहरातील विविध छोट्या मोठ्या वस्त्यावरील, विविध जाती धर्मातील गोरगरीब गरजू साठी अन्नदानाचा उपक्रम राबवण्यात आला. भगवान महावीर जन्मकल्याण उत्सवात विविध कार्यक्रम घेण्यात आले.

## अंबाजोगाई शहराला पुस्तकाचे गाव म्हणून घोषित

अंबाजोगाई शहर हे पुस्तकाचे गाव म्हणून आज उच्च तंत्र शिक्षण, उद्योग तथा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी घोषित केले. राज्य शासनाच्या निर्णयाप्रमाणे अंबाजोगाई हे राज्यातील पाचवे पुस्तकाचे गाव म्हणून घोषित करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने २०१७ साली तत्कालीन सांस्कृतिक कार्य आणि मराठी भाषा मंत्री विनोद तावडे यांच्या संकल्पनेतून पुस्तकाचे गाव (इेज्ञ तळश्रश्ररसश) हा उपक्रम सुरू करण्यात आला. या संकल्पनेतून ४ मे २०१७ साली सातारा जिल्ह्यातील भिलार हे गाव पुस्तकाचे गाव म्हणून घोषित करण्यात आले आणि याच दिवशी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मराठी भाषा मंत्री मा.ना.विनोद तावडे यांनी एका वाचनालयाची सुरुवात भिलार या गावात करण्यात आली. या भिलार गावातील प्रत्येक घरात एक छोटी लायब्ररी आहे. जिथे विविध विषयांवरील पुस्तके उपलब्ध आहेत. येथे प्रत्येक घरात प्रवेश खुले आहेत. त्यामुळे नागरीक आणि पर्यटक या घरांमध्ये जावून पुस्तके वाचू शकतात. या गावात २५ घरांमध्ये १५,००० हुन अधिक पुस्तकांसह तेंव्हा हा उपक्रम सुरू करण्यात आला होता. राज्यात वाचन संस्कृती वाढावी, मराठी भाषेचा प्रचार प्रसार व्हावा यादृष्टीने पुस्तकाचे गाव योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा टप्प्या-टप्प्याने विस्तार करण्यात येत असून नव्याने विकसित करण्यात येणाऱ्या गावांमध्ये वाचकांना दर्जेदार पुस्तके उपलब्ध करून द्यावीत, असे शासनाचे निर्देश आहेत. या योजने अंतर्गत आज पर्यंत भिलार या गावासह छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरूळ, गोंदिया जिल्ह्यातील नवेगाव बांध, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पोंभूर्ले आणि सांगली जिल्ह्यातील अंकलखोप (औदु ंबर) येथे पुस्तकांचे गाव योजनेचा विस्तार करण्यास मान्यता देण्यात आली आहे.



तालुक्यातील चांदापूर येथील शेतकरी चंदू गीते यांच्या गाईला दोन पीलयांना जन्म दिला असून एक कारवड व एक गोर असे दोन पिल्ले दिले असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, परळी तालुक्यातील चांदापूर येथील रहिवाशी चंद्रकांत गीते यांच्याकडे लहानपणापासूनच असलेली गाय होती या गाईने काल दिनांक १५ रोजी दोन पिलांना जन्म दिला. याबद्दल सदरील गावातील लोकांमध्ये कुतूहल निर्माण झाले असून याबद्दल संबंधित शेतकऱ्यांनी या गायीबद्दल गावामध्ये पेढे वाटून आनंद साजरा केला असल्याची माहिती ही प्रसिद्धी पत्रकारद्वारे दिली आहे.

## खर्डेवाडी येथे ह.भ.प.तनया दिदी बढे यांचे हरीकिर्तन

तालुक्यातील मौजे खर्डेवाडी येथे सालाबाद प्रमाणे याही वर्षी चैत्र वद्य पंचमी दि.१८/४/२५ ला अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. नाम सप्ताहाचे हे ५५ वे वर्ष आहे. ह.भ. प महादेव महाराज तात्या,ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे .ह.भ.प.भिवसेन महाराज भोसले,ह.भ.प राजेन महाराज भोसले यांच्या शुभ हस्ते सप्ताहाची सुरवात होणार आहे . या सात दिवस चालणाऱ्या नाम सप्ताह मध्ये काकडा, भजन,ज्ञानेश्वरी पारायण,गाथा भजन ,भावार्थ रामायण,प्रवचन, हरिपाठ व हरिकिर्तनआणि हरिजागर असे विविध कार्यक्रम आहेत . या सप्ताह मध्ये ह.भ प. राजेन महाराज भोसले,ह.भ प. श्रीनिवास महाराज जगताप,ह.ह.प. श्री किसन महाराज पवार,ह.भ.प. रतन महाराज,ह.भ.प.सतीश महाराज, ह भ.प. दिपक महाराज तसेच सप्ताहात एकमेव महिला कीर्तनकार ह.भ.प. तनाया दिदी बढे , खेड जी.पुणे यांचे शनिवार दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी रात्री ९ ते ११ या वेळेत शुश्राव्य हरिकीर्तन होणार आहे तरी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सर्व कार्यक्रमाचा आनंद घ्यावा. असे आवाहन मुकादम मंडळ खर्डेवाडी यांनी केले आहे

# तो कुत्रा मी दत्तक घेणार, भिडेंना कुत्रा चावल्यानंतर वकिलाने केली घोषणा!

सांगलीत एका धारकऱ्याच्या इथे गेलेले असताना संभाजी भिडे यांना एका कुत्र्याने चावा घेतला आहे. सध्या त्यांना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. सध्या त्यांची प्रकृती आहे. दरम्यान, भिडे यांना कुत्रा चावल्यानंतर वेगवेगळ्या स्तरातून प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत. कुत्रा हा प्रामाणिक प्राणी असतो, तो भिडे यांना का चावला याची एसआयटी चौकशी करायला हवी, अशी खोचक टिप्पणी वडेट्टीवार यांनी केली. त्यानंतर ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ येथील ॲड. जय गायकवाड यांनी तर मोठी घोषणा केली आहे. भिडे यांना जो कुत्रा चावला आहे, त्याला मी दत्तक घेणार आहे, असं गायकवाड यांनी म्हटलंय.मी कुत्र्याला दत्तक घेणार..

संभाजी भिडे यांना सोमवारी सांगलीमध्ये एक कुत्री (श्वान) चावला होता. त्यानंतर संभाजी भिडे यांनी शासकीय रुग्णालयामध्ये उपचार घेतले होते. मात्र उल्हासनगरमधील ॲड. जय गायकवाड यांनी एक मोठी घोषणा केली आहे. संभाजी भिडे यांना जो कुत्रा चावला आहे, त्याला मी दत्तक घेणार आहे. तसंच त्या कुत्र्याची संपूर्ण काळजी आम्ही स्वतः घेणार असं जय गायकवाड म्हणाले आहेत. तेसच नागरिकांना हा कुत्रा आढळल्यास त्यांनी माझ्याशी संपर्क साधावा असे आवाहनही त्यांनी केलेय.विशेष म्हणजे जो नागरिक या कुत्र्याची माहिती देईल त्याचा स्वराज्य संघटनेकडून मोठा सत्कार देखील आम्ही करू अशी माहिती ॲड. जय गायकवाड यांनी दिली आहे.संभाजी भिडेंना कुत्रा कधी चावला?मिळालेल्या माहितीनुसार




संभाजी भिडे यांना सोमवारी एका कुत्रीने चावा घेतला. ते सांगली शहरातील माळी गल्लीत एका धारकऱ्याच्या घरी गेले होते. या धारकऱ्याकडून भिडे यांना जेवणाचे आमंत्रण होते.

# आणि म्हणून, ठाकरेंनी केली शिंदेंची नक्कल, दाढीला हात लावत म्हणाले:

उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या पक्षाच्या नाशिकच्या मेळाव्यात जोरदार भाषण केले. आपल्या या भषणात त्यांनी भाजपावर सडकून टीका केली. हिंदुत्त्व, वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक आदी मुद्द्यांवर बोलताना त्यांनी भाजपाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. तसेच आपल्या भाषणात बोलत असताना त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे (Eknath Shinde) यांचीही नक्कल केली. मला बाप चोरण्याची जरज नाही, असे म्हणत त्यांनी एकनाथ शिंदेंचे नाव न घेता त्यांच्यावर हल्लाबोल केला.

हिंदुत्त्वाला काही शेंडा-बूड आहे की नाही?भाजपाचे हिंदुत्त्व हे बेगडी आहे, असा दावा ठाकरेंनी केला. "आपल्याकडे गोवंश हत्याबंदी आहे. माझा त्याला विरोध नाही. पण जे किरण रिजिजू म्हणाले होते की ते गोमांस खातात. तेच आता तुमचे मंत्री आहेत. रस्त्यात संशय आला म्हणून तथाकथित गोरक्षकांनी त्याचा पाठलाग केला आणि गोळ्या घालून मारलं. पण रिजिजू तुमच्या बाजूला बसून वक्फ बोर्ड सुधारणेचं विधेयक मांडतात. मग तुमच्या हिंदुत्त्वाला काही शेंडा-बूड आहे की नाही?" असा हल्लाबोल ठाकरेंनी भाजपावर केला आहे.

मात करूण पुढे जाण्याची हिंमत...

"या सर्व गोष्टी पाहिल्यानंतर आता महाराष्ट्रावर खरी जबाबदारी आहे. कारण महाराष्ट्र देशाला दिशा दाखवत आला हे आपण इतिहासात ऐकलेलं आहे. आपण नालायक ठरू शकत नाही. कधीकधी खड्डे येतात. पण त्यावर मात करूण पुढे जाण्याची आपल्याला हिंमत पाहिजे," असे म्हणत ठाकरेंनी कार्यकर्त्यांत उत्साह भरण्याचा प्रयत्न केला. मी दाढी वाढवलेली नाही तसेच पुढे बोलताना त्यांनी उपमुख्यमंत्री यांची नक्कल केली. "खड्ड्यांवर मात करून पुढे जाण्याची हिंमत पाहिजे. म्हणूनच मी एक गोष्ट सर्वांना सांगतो. आणि...म्हणून... (एकनाथ शिंदे




यांच्या भाषण शैलीत) असं नाही. कारण अजूनही मी खाजवायला दाढी वाढवलेली नाही. मला असे दुसऱ्याचे वडील चोरायची गरजही नाही. जे आहेत एसंशी त्यांना सोडून द्या," अशी उपहासात्मक टीका ठाकरेंनी शिंदेंवर त्यांचे नाव न घेता

## राज्यात तिसऱ्या आघाडीचा प्रयोग, २० एप्रिल रोजी नव्या आघाडीवर शिक्कामोर्तब ?

महाराष्ट्राचे राजकारण युती आणि आघाडीवर सुरु झाले आहे. राज्यात शिवसेना-भाजप युती होती. त्यानंतर त्या युतीमध्ये अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आल्यानंतर महायुती झाली. महायुतीला आव्हान देण्यासाठी शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उबाठा आणि काँग्रेस यांची महाविकास आघाडी निर्माण झाली. विधानसभा निवडणुकीपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू राजरत्न आंबेडकर यांनी मनोज जरांगे यांना सोबत घेऊन तिसरी आघाडी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. परंतु तो यशस्वी झाला नाही. आता राज्यातील तीन बडे नेते राजू शेट्टी, बच्चू कडू आणि महादेव जानकर एकत्र येत आहे. त्या नेत्यांनी तिसऱ्या आघाडीचा प्रयत्न सुरु केला आहे. त्यावर येत्या २० एप्रिल रोजी शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.

राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांचा २० एप्रिल रोजी वाढदिवस आहे. त्यानिमित्त बच्चू कडू मोठा निर्णय घेणार आहे. राष्ट्रीय समाज पक्षाने पुण्यात युवा संघर्ष निर्धार परिषद भरवली आहे. त्यावेळी महादेव जानकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मेळाव्याच आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याला बच्चू कडू आणि राजू शेट्टी उपस्थित राहणार आहेत. या दिवशी राजू शेट्टी आणि बच्चू कडू मोठा निर्णय जाहीर करणार आहेत.

## शॉर्ट सर्किट मुळे आखाड्याला लागली भीषण आग

जिंतूर : तालुक्यातील सावरगाव तांडा येथील शेतकरी जनार्दन दिपला पवार यांच्या सावरगाव येथील गट क्रमांक १३७ मधील राहत्या शेत आखाड्यावर दि .१५ एप्रिल मंगळवार रोजी सकाळी ११: ४५ वाजण्याच्या सुमारास शॉर्टसर्किटमध्ये भीषण आग लागली. तालुक्यातील सावरगाव तांडा येथे पंधरा पंधरा दिवसातील ही दुसरी घटना असून येथील जनार्दन दिपला पवार त्यांच्या राहत्या शेत आखाड्यावर भीषण आग लागून संसार उपयोगी साहित्यसह शेती उपयोगी साहित्य जळून खाक झाल्याची घटना घडली आहे. दरम्यान या आगीमध्ये शेती उपयोगी पिंककलरचा सट, नुकताच शेतातून गहू काढून आखाड्यावर ठेवलेल्या तीन बॅग, ज्वारी, नुकतेच सोयाबीन विकून मिळालेल्या ६० हजारातून उरलेले ३५ हजार रोख रक्कम, फवारा, टीव्ही, यासह सर्व वस्तू खाक झाले आहे. जनार्दन पवार व त्यांच्या पत्नी यांच्या अंगावर परिधान केलेले कपडे मात्र शिल्लक आहे. या लागलेल्या भीषण आगीत आग विझवण्यासाठी धडपड करणाऱ्या जनार्दन पवार व त्यांच्या पत्नी यांना आगीचे चटके लागून जखमी झाली आहे. शासन दरबारी आर्थिक मदत मिळण्याचे आवाहन जनार्दन पवार यांनी एका निवेदनाद्वारे तहसीलदार यांच्याकडे केली आहे.

# शिवरायांचे स्मारक राजभवनावर होऊ द्या, उद्धव ठाकरे यांचा उदयनराजे यांच्या मागणीला पाठींबा

भाजपाचे खासदार उदयनराजे भोसले यांनी राजभवनाच्या जागेवर शिवरायांचे भव्य स्मारक होऊ द्या अशी मागणी केली होती. शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांना नाशिकच्या मेळाव्या उदयनराजे भोसले यांच्या मागणीला पाठींबा देत राज्यपालापेक्षा शिवरायांचे स्थान मोठे असल्याने राजभवनाच्या जागेवरच शिवरायाचे स्मारक व्हावे अशी मागणी भर सभेत केली आहे.उद्धव ठाकरे म्हणाले की अरबी समुद्रात शिवरायांचे स्मारक उभारण्याचा संकल्प आणि जलपूजन झाले होते. त्यावेळी भाजपा सोबत आपण होतो. अरबी समुद्रात नरेंद्र मोदी यांच्या सोबत समुद्रात बोटीने गेलो होतो. त्यानंतर दोन वर्षात देवेंद्र फडणवीस शिवरायाचे स्मारक उभारतील असे वाटले होते. परंतू एक विटही उभी केलेली नाही. त्यामुळे राजपालांना एखादा मंत्र्यांचा बंगला देऊन टाका. अनेक मंत्र्यांकडे दोन दोन बंगले आहेत.त्यामुळे छत्रपती शिवाजी



महाराज यांचे स्मारक उभारण्यास आता मुंबईत कुठे जागा नाहीए, त्यामुळे राजभवनावरच हे स्मारक उभारणे उचित होईल असेही उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.उद्धव ठाकरे काय म्हणाले...मी मागे एक मुद्दा मांडला होता. आता उदयनराजे भोसले बोलले. ते बरोबर बोलले. नरेंद्र मोदींच्या हस्ते शिवस्मारकाचं जलपूजन झालं. मोदींना पट्टा बांधला. त्यांनी फुलं वाहिली. आम्हाला वाटलं फडणवीस बसले स्मारक दोन तीन वर्षात होईल. अरबी समुद्रात स्मारक होत नसेल तर उदयनराजे बोलले ते बरोबर आहे असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.राज्यपालांना कुठे तरी शिफ्ट करा उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की शिवाजी महाराजांपेक्षा राज्यपाल मोठे नाही. होऊच शकत नाही. राज्यपाल पद सुद्धा सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे मारले आहे. आपल्यावेळी कोश्यारी कसे वागत होते पाहिलं आहे. काय तो थाट, कशाला पाहिजे. राज्यपाल पदाचा अवमान त्या खुर्चीवरची व्यक्तीच करत असेल तर काय करायचं ते पाहा. राज्यपालांना कुठे तरी शिफ्ट करा. राज्यपाल भवनाच्या जागी शिवस्मारक उभं करा. तसाही राज्यपालांचा जनतेशी संबंध असतो किंवा नसतो. मंत्र्यांकडे दोन दोन तीन तीन बंगले आहेत. द्या राज्यपालांना एक बंगला. मुंबईत जागा राहिली नाही.

# मुंबईत यंदा जोरदार पाऊस बसरणार, सामान्यापेक्षा जास्त पावसाचा अंदाज

मुंबईकरांसाठी यंदा मान्सूनची चांगली बातमी आहे. मुंबई आणि उपनगरात चांगल्या पावसाचे संकेत आहे. मुंबईत सामान्यपेक्षा जास्त पावसाचा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने व्यक्त केला आहे. हवामान विभागानुसार, जास्त पावसाचा अंदाज हा 65% आहे. हवामान विभागाचा अंदाज बरोबर ठरल्यास मुंबईकरांना दिलासा मिळणार आहे.

मुंबईसारख्या दाट लोकवस्ती आणि मोठी लोकसंख्या असलेल्या शहरात पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात होतो.



मुंबईला होणारा सर्व पाणी पुरवठा तलावांद्वारे केला जातो. तलावांमध्ये साचणारे पावसाचे पाणी वर्षभर मुंबईची तहान भागवते. यामुळे चांगला पाऊस पडला तर मुंबईकरांना पाणीकपातीचा सामना करावा लागणार नाही. प्रादेशिक हवामान विभागाच्या शास्त्रज्ञ सुषमा नायर म्हणाल्या की, प्राथमिक अंदाजानुसार मुंबईत सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता 65% आहे. तथापि, हवामान विभागाकडून आणखी एक अहवाल प्रसिद्ध केला जाणार आहे. त्यात यंदाच्या मान्सून पॅटर्नबाबतची परिस्थिती अधिक स्पष्ट होईल. हवामान खात्याच्या प्राथमिक अंदाजानुसार, यंदा मुंबईसह महाराष्ट्रात मान्सून चांगलाच बरसणार आहे. राज्यातील सर्वच भागांत मान्सून सक्रीय असणार आहे. काही ठिकाणी सामान्य पाऊस पडण्याची शक्यता आहे तर काही ठिकाणी सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. अनेक भागात अतिवृष्टीची शक्यता आहे.मुंबईत तापमान घसरले मुंबईच्या दिशेने वाहणारे वारे सक्रिय झाले आहेत. यामुळे मुंबई महानगरात दिवसाच्या तापमानात घट झाली आहे. मंगळवारी मुंबईत कमाल तापमान 36.2 अंश सेल्सिअस होते, परंतु बुधवारी ते 34.8 अंश सेल्सिअसपर्यंत घसरले. मुंबईत तापमान कमी झाले असले तरी आर्द्रतेचे प्रमाण वाढले आहे. मुंबईतील रात्रीच्या तापमानात कोणताही बदल झालेला नाही.

## केकवर लिहिली IPCची कलमं, नंतर प्रश्न चिन्ह

भांडूपमध्ये एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका कुविख्यात गुंडाने त्याचा वाढदिवस भलत्याच पद्धतीने साजरा केला. या गुंडाने त्याच्या वाढदिवसाच्या केकवर गुन्ह्यांची कलमं लिहिली. त्यानंतर त्याने त्यावर प्रश्नचिन्ह दिलं. यानंतर त्याने एक वाक्य उच्चारलं. पुढील गुन्ह्याची प्रतिक्षा आहे, असं तो म्हणाल्याचा प्रत्यक्षदर्शीचा दावा आहे. या गुंडाच्या वाढदिवसाचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. हा व्हिडिओ व्हायरल होताच पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या आहेत.

झिया अन्सारी असं या कुविख्यात गुंडाचं नाव आहे. तो भांडुपमध्ये राहतो. त्याने त्याचा वाढदिवस अजबच प्रकारे साजरा केला. त्याने केलेल्या गुन्ह्याची कलमं या केकवर होती. एकप्रकारे गुन्ह्याचा गौरवच त्याने केला होता. वाढदिवसाच्या सेलिब्रेशनचा हा व्हिडिओ आणि फोटो व्हायरल झाल्यानंतर काही तासातच, सोमवारी रात्री पोलिसांनी त्याला अटक केली. पोलीस त्याची कसून चौकशी करत आहेत.

# हा तर बाळासाहेबांचा अपमान:त्यांचा आत्मा:अरव भाषणावर शिंदेंच्या सेनेचा जोरदार हल्लाबोल!

उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाचा नाशिकमध्ये भव्य मेळावा 16 एप्रिल रोजी पार पडला. या मेळाव्यात बाळासाहेब ठाकरे यांच्या आवाजातील AI भाषण शिवसैनिकांना ऐकवण्यात आले. म्हणूनच या भाषणाची आणि नाशिकच्या मेळाव्याची सध्या सगळीकडे चर्चा होत आहे. बाळासाहेबांच्या या एआय भाषणात शिवसेना फुटीवर भाष्य करण्यात आलंय. याच भाषणात निष्ठावंत म्हणून घेणारे गद्दार निघाले, असंही या म्हणण्यात आलंय. आता याच भाषणावर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते तथा खासदार नरेश म्हस्के यांनी प्रतिक्रिया दिलीय.



बाळासाहेबांच्या बनावट आवाजाचा उपयोग करावा लागतोय याचे वाईट वाटतेय. बाळासाहेबांचे खरे विचार आमच्यासोबत आहेत, असं म्हणत म्हस्केंनी ठाकरेंवर हल्लाबोल केला आहे.बाळासाहेबांच्या आवाजाची नक्कल करून…"त्यांनी बाळासाहेबांचे विचार सोडले आहेत. बाळासाहेबांच्या बनावट आवाजाचा उपयोग करावा लागला याचं वाईट वाटत आहे. पण बाळासाहेबांचा ओरिजनल विचार आमच्यासोबत आहे. त्यांना बनावट कॅसेटचा उपयोग करावा लागला आहे," अशी खोचक टीका नरेश म्हस्केंनी केला. तसेच बाळासाहेबांच्या आवाजाची नक्कल करून आमच्यावर टीका करत आहेत. बाळासाहेबांचा आत्मा काय म्हणत असेल," असे म्हणत त्यांनी ठाकरेंच्या शिवसेनाला डिवचलं.

### हा बाळासाहेबांचा अपमान आहे

"त्यांचा पक्ष शिल्लक राहिलेला नाही. त्यांना सर्वच सोडून चालले आहेत. म्हणून बाळासाहेबांच्या आवाजात बोलायला लावून बनावटगिरी करत आहेत. हा बाळासाहेबांचा अपमान आहे," असा हल्लाबोल म्हस्के यांनी केला.

### तुमचे हिंदुत्व जगाला कळले आहे

उद्धव ठाकरे यांनी हिंदुत्वाच्या मुद्द्यावर बोलताना भाजपावर सडकून टीका केली. यालाच उत्तर म्हणून "बाळासाहेबांची वक्फ कायदा रद्द करण्याची मागणी होती. त्यांनी मेळावा सभागृहात का घेतला. हा मेळावा मैदानात घ्यायचा होता ना सावरकरांचा अपमान कोणी केला? शिवाजी महाराजांचा अनादर कोणी केला? तुमचे हिंदुत्व जगाला कळले आहे," असं प्रत्युत्तर नरेश म्हस्केंनी दिलं.

### दाढी वाढवण्याकरता…

उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात एकनाथ शिंदे यांची नक्कल केली. तसेच दाढीचा उल्लेख करून त्यांनी शिंदेंनाही डिवचलं. "हातात तलवार पकडायला मनगटात जोर लागतो. आपला सर्व जोर फेसबुक वरती आहे. दाढी वाढवण्याकरता छत्रपती शिवाजी महाराजांचा विचार हृदयात लागतो. तोही विचार तुमच्यात नाही. दाढी, तलवार आणि मनगट या गोष्टी विसरून जा," अशी जोरदार टीका नरेश म्हस्के यांनी केली.

## मंत्री उदय सामंत यांनी घेतली मनोज जरांगेंची भेट:जरांगेंची भावना मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या कानावर घालण्याचा शब्द

राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी बुधवारी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी जरांगे यांनी शासनाचा प्रतिनिधी म्हणून माझ्यापुढे उपस्थित केलेला त्यांच्या प्रलंबित मागण्यांचा मुद्दा येत्या २३ तारखेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या कानावर घालणार असल्याचे स्पष्ट केले. उदय सामंत म्हणाले की, आज मी मनोज जरांगे पाटलांशी सर्वांसमोर चर्चा केली. मी बीडला एका कार्यक्रमाला जात होतो. मला रस्त्यात कळले की, ते शहागड येथील कार्यालयात आहेत. त्यांनी सामाजिक कामासाठी कार्यालय सुरू केले आहे. माझे व त्यांचे चांगले संबंध आहेत. त्यामुळे मी त्यांना भेटण्यासाठी येथे आलो. आज त्यांच्यासोबत जी काही भेट झाली, ती सर्वांपुढे झाली. ती कॅमेऱ्यामध्येही कैद झाली आहे. याशिवाय दुसरी कोणतीही चर्चा आमच्यात झाली नाही. त्यांनी सामाजिक स्तरावरील दोन-तीन मुद्दे सांगितले. त्यावर मी व खासदार संदिपान भुमरे २३ तारखेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार आहोत. ज्या गोष्टी लवकरात लवकर करण्यासारख्या आहेत, त्या लवकर करण्याचा आमचा प्रयत्न असेल. हीच विनंती व सूचना त्यांनी केली आहे. जरांगेंच्या मागण्या अजूनही प्रलंबितच सरकारने मनोज जरांगे यांच्या मागण्या अजूनही पूर्ण केल्या नाहीत, अशी बाब यावेळी पत्रकारांनी उदय सामंत यांच्या निदर्शनास आणून दिली असता ते म्हणाले की, जरांगे यांनी त्यांची भावना माझ्याकडे बोलून दाखवली आहे. आज २३ तारीख आहे. त्यांच्या उपोषणाला ३० तारखेला ३ महिने होतील. शासनाचा प्रतिनिधी आहात. तुम्ही माझ्या कार्यालयात भेटण्यासाठी आला असला तरी मी सामाजिक काम करणारा माणूस आहे. माझा हा निरोप, विनंती किंवा सूचना मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या कानावर घाला असे ते म्हणालेत. यात काही वावगे आहे असे मला वाटत नाही. त्यामुळे होणारी कामे लवकरात लवकर व्हावी अशी त्यांची इच्छा आहे. त्याचा पाठपुरावा आम्ही सर्वजण करू. सरकार जरांगेंकडे दुर्लक्ष करते का? एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होते तेव्हा जरांगे यांच्या अनेक मागण्या मान्य करण्यात आल्या. पण आता त्यात कुठेतरी खिळ बसल्याचे चित्र आहे, असा प्रश्नही पत्रकारांनी यावेळी उदय सामंत यांना केला. त्यावर सामंत यांनी असे काहीही नसल्याचे स्पष्ट केले. असे माझे मत नाही. असे जरांगे यांनाही वाटत नाही. त्यांचे उपोषण सोडवत असताना राज्याच्या मुख्यमंत्र्यांनीही लक्ष घातले होते. काही वेळ मागेपुढे होत असेल, पण त्यांच्या मागण्यांविषयी आम्ही २३ तारखेला मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहोत. या भेटीत गॅझेट लागू करण्यासंदर्भात त्यांच्याशी चर्चा केली जाईल. मनोज जरांगे यांनी माझ्यापुढे गुन्हे मागे घेण्याचाही विषय मांडला. शिंदे समितीचे काम सुरू झाल्याचे दिसत नाही. काही अधिकारी जाणिवपूर्वक काही गोष्टी करत नाही अशी भावना त्यांनी शासन म्हणून किंवा मित्र म्हणून माझ्याकडे व्यक्त केली. मी ही गोष्ट एकनाथ शिंदे यांच्यापुढे मांडेन, असेही सामंत यावेळी म्हणाल

## समाधान महाराज शर्मा यांनी घेतला शिरखुरमा गुलगुलेचा आस्वाद

मानूर ।प्रतिनिधी शिरूर तालुक्यातील राक्षसभुवन येथे सुरू असलेल्या श्री क्षेत्र नगद नारायण गडाच्या नारळी सप्ताहात केज येथील प्रसिद्ध कथाकार ह.भ.प.समाधान महाराज शर्मा यांच्या कथेचे आयोजन करण्यात आले होते.नारळी सप्ताह समाप्तीच्या पूर्वसंध्येला कथाकार समाधान महाराज शर्मा आणि त्यांना साथसंगत देणाऱ्या साधकांचा सय्यद परिवाराच्या वतीने शिरखुरमा आणि गुलगुलेचा पाहुणचार करण्यात आला.कथा सुरु झाल्यापासून समाधान महाराज शर्मा यांच्या कथेला साथसंगत देणारा सर्व चमू केंद्रप्रमुख लतिफ सय्यद यांच्या निवासस्थानी आठ दिवस निवासासाठी थांबला होता.सदरील कालावधीत त्यांची सेवा सुश्रुषा करण्याचे काम मुस्लिम परिवाराने सर्व नियम धर्म पाळून केले.दुपारी एक ते चार या वेळेत समाधान महाराज यांची कथा असायची.या कथेला संपूर्ण मंडप भरायचा.गत महिन्यात रमजान ईदचा सण मोठ्या उत्साहात साजरा झाला.त्याचाच एक भाग म्हणून ईद मिलापच्या निमित्ताने समाधान महाराज शर्मा यांना लतिफ सय्यद यांनी पाहुणचारासाठी निमंत्रित केले होते.या वेळी केंद्रप्रमुख लतीफ हमीद सय्यद यांच्यासह त्यांच्या पत्नी हलीमा लतीफ सय्यद,मुलगा अतिक,आवेज,आई महेताब व दोन बहिणी तसेच भाऊ सिराज आणि शौकत सय्यद या कौटुंबिक सदस्यांसह सर्पमित्र महेश औसरमल,सामाजिक कार्यकर्ते कर्ण तांबे, गोकुळ खोले,गणेश सातपुते,शिवाजी खोले, पंकज खोले यांची उपस्थिती होती

## शेतकऱ्यांनी खोडवा जाळताना बांधावरील झाडे होरपळून जाताहेत

लिंबागणेश: दरवर्षी रब्बी हंगामातील ज्वारीचे, गव्हाचे पिक निघाल्यानंतर शेतीची मशागत सुरू होते.यादरम्यान शेतकरी आपल्या शेतात खत टाकणे,नांगरणी करणे आदी कामे करतात.यादरम्यान ज्वारी ,गव्हाचा खोडवा नष्ट करण्यासाठी शेताच्या कडेला असलेल्या ताली पेटवुन देतात. रस्त्यालगत असणाऱ्या शेतजमीन मालकांकडून लावलेल्या आगीत झाडे होरपळून निघतात. झाडांची मोठी हानी होते. झाडे लावा,झाडे जगवापाणी अडवा पाणी जिरवा अशा आपण दिलेल्या घोषणा हवेतच विरतात.त्याची अंमलबजावणी किती प्रमाणात होते याचा विचार केला जात नाही.ग्रामीण भागातील शेतकरी पिकांना वसवा नको म्हणून बांधावरील झाडे तोडतात. उष्णतेचा दाह वाढल्याने हवामान आणि पृथ्वीच्या तापमानावर दुष्परिणाम होतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी खोडवा जाळताना बांधावरील झाडांना ईजा होणार नाही याची काळजी घ्यावी असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबा गणेश कर यांनी केले आहे. वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे या वृक्षसंपदेचे,वनसंपदेचे महत्व पटवुन देणा-या जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा आपल्याला विसर पडला असुन तो अंगिकारला तरच पुढील पिढ्या सुखाने आनंदाने जगतील. माणसाला सुसह्यपणे जगण्यासाठी मोठ्या प्रमाणात झाडांची लागवड करणे गरजेचे आहे. पुर्वी रस्त्याच्या बाजूला वडाची,पिंपळाची,लिंबाची मोठमोठाली झाडं असायची.

## बीड आगारात मा. फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

बीड ।प्रतिनिधी बीड आगारात महामानव क्रांती सूर्य महात्मा ज्योतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती बीड आगारात विभाग नियंत्रक अनुजा दुसाने यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या उत्सव समितीच्या वतीने सर्व प्रमुख पाहुणे एस.टी. महामंडळातील अधिकारी कर्मचारी यांना भारताचे संविधान यांच्या प्रति वाटून एक अनोखा उपक्रम राबवण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवराज कराड, विभागीय वाहतूक अधिकारी, आगाराचे आगर प्रमुख श्री डोके साहेब, चंद्रकांत आप्पा नवले, माजी शिवसेनाप्रमुख सेवानिवृत्ती झालेले कर्मचारीवर्ग पर्यवेक्षक श्री भोले साहेब, विभागीय वाहतूक निरीक्षक गणेश जगताप, वाहतूक निरीक्षक भीमकिरण बनसोडे, वाहतूक निरीक्षक ज्योती नागरगोजे वाहतूक नियंत्रक मामा गायकवाड, वाहतूक नियंत्रक सुभाष कोकाटे, वाहतूक कास्ट्राईब संघटनेचे विभागीय अध्यक्ष सुरेश ससाने, सचिव मोहम्मद, रियाज सहाय्यक निरीक्षक, शिशिर



कुमार वाघमारे,अतुल कुलकर्णी, सेवानिवृत्त वाहतूक नियंत्रक बबन वडमारे, गणेश चव्हाण, संतोष जाधव सहाय्यक वाहतूक निरीक्षक, सेवाशक्तीचे गोरे , विनोदी शेख, या सर्व प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत भारताचे संविधान सर्व कर्मचाऱ्यांना व उपस्थित प्रमुख पाहुण्यांना भारताचे संविधान वाटप करण्यात आले या उत्सवासाठी विभागीय कार्यालय बीड आगार बीड आगार कार्यशाळा या ठिकाणी कर्तव्य असणारे सर्व कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते. या सर्व कर्मचाऱ्यांना भारतीय संविधानाचे वाटप बीड विभागाच्या विभाग नियंत्रक सौ अनुजा दुसाने शिवराज कराड आगार प्रमुख डोके सर यांच्या हस्ते वाटप करून एक स्तुत्य उपक्रम क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राबविण्यात आला.

# इतिहासात तुमची नोंद गद्दार म्हणूनच: गंगेत कितीही डुबक्या मारल्या तरी: बाळासाहेब ठाकरे AI

नाशिकमध्ये शिव[illegible] ठाकरे गटाचे निर्धार शिबीर पार पडले. यावेळी हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे याच्या आवाजातील एक व्हिडीओ क्लिप दाखवण्यात आली. या व्हिडीओमध्ये AI टेक्नोलॉजीचा वापर करत बाळासाहेब ठाकरेंच्या आवाजातील भाषण दाखवण्यात आले. जमलेल्या माझ्या तमाम हिंदू बांधवांनो भगिणींनो आणि मातांनो… असे शब्द कानावर पडताच नाशिकमध्ये उपस्थित असलेल्या शिवसैनिकांच्या अंगावर काटा आला. यानंतर सभागृहात सर्वत्र बाळासाहेब ठाकरे यांच्या आवाज घुमला. नाशिकमधील या निर्धार मेळाव्यात बाळासाहेब ठाकरेंच्या आवाजातील भाषणाने प्रत्येकाच्या अंगावर काटा आला. कमळाबाई म्हणजे एक ढोंग आहे ढोंग, देशात यांना कुणीच ओळखत नव्हतं तेव्हा आम्ही त्यांना आधाराचा खांदा दिला. महाराष्ट्रात त्यांना आम्हीच वाढवलं पण आता त्यांना खांदा द्यायची वेळ आलीय… हे वाक्य शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आवाजातून कानावरं पडलं. यावेळी शिवसेनाप्रमुखांच्या स्टाईलमध्ये भाजपसह महायुतीवर टीका करण्यात आली. बाळासाहेब ठाकरेंच्या आवाजातील संपूर्ण भाषण जसंच्या तसं "जमलेल्या माझ्या हिंदू बांधवांनो भगिणींनो आणि मातांनो… आज तुफान गर्दी दिसतेय. नाशिक म्हटलं तर गर्दी उसळणारच. नाशिक आणि




शिवसेनेचं एक नातं आहे आणि ते राहणारच. नरेंद्र मोदी म्हणतात तसं हे नातं नाही. नाशिकसे मेरा पुराना नाता है. में यहाँ वीर सावरकर जी के साथ काम करता था. जातील तिथे गंडवायचं आहे. ही काही नाती जपणारी माणसं नाहीत. कमळाबाई म्हणजे एक ढोंग आहे ढोंग, देशात यांना कुणीच ओळखत नव्हतं तेव्हा आम्ही त्यांना आधाराचा खांदा दिला. महाराष्ट्रात त्यांना आम्हीच वाढवलं पण आता त्यांना खांदा द्यायची वेळ आलीय… 25 वर्ष आमचं एक नातं त्यांच्याबरोबर हिंदुत्व म्हणून एक नातं नक्कीच होतं. महाराष्ट्रात शिवसेनेमुळे ते वाढले. मग नातं मोडलं कुणी. माझ्या पोतडीत यांच्या खूप गोष्टी आहेत. हळू हळू काढतो… त्यातच मजा असते. नाशिककर मला विसरूच शकत नाही. अरे बाबांनो शिवसेना आहे म्हणून तुम्ही आहात. हा जो समोर साधा शिवसैनिक बसलाय ना तो महत्त्वाचा आहे. त्याने तुम्हाला आमदार खासदार बनवलं. सध्या बातम्या सुरू आहेत, हा गेला तो गेला. अस्वलाच्या अंगावरचे दोन चार केस उपटले तर काय फरक पडतो. आता ही सगळी नवीन मंडळी आली आहेत. नाशिकचं गोल्फ मैदान गाजवलंय. सभेला पैसे देऊन माणसं आणण्याचा दळभद्रीपणा आम्हाला कधीच करावा लागला नाही. आई जगदंबेची तेवढी कृपा आमच्यावर आहे व ती राहणारच. या विधानसभेच्या निवडणुकीत काय झालं. जो निकाल लागला तो तुम्हाला मान्य आहे का? बडगुजर, योगेश घोलप, वसंत गिते, अनिल कदम अद्वय हिरे, अनिल गोटे हे मैदानात होते, लोकांची कामं केली, राबराब राबले, लोकांची कामं केली पण निकाल उलटेच लागले. भाजप व त्या नकली शिवसेनेने असे काय दिवे लागले की त्यांना भरभरून मतं मिळाली.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com